The e-auction will be conducted through Bank's e-Auction service provider M/s PSB Alliance Private Limited at their web portal **https://baanknet.com.** The interested bidders shall ensure that they get themselves registered on the e-auction website and deposit earnest money in the virtual wallet created by service provider as per guidelines provided on **https://baanknet.com**.The interested bidders who require assistance in creating Login ID & Password, uploading data, submitting Bid documents, Training/Demonstration, Terms & conditions on online Inter-se Bidding etc., may visit the website **https://baanknet.com**

For detailed terms and conditions of the sale, please refer to the link provided in State Bank of India the Secured Creditor **Website www.sbi.co.in , https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others and https://baanknet.com**

Statutory Notice under Rule 8(6) of the SARFAESI Act: This is also a notice to the Borrower/Guarantor of the above loan under Rule 8(6) of the SARFAESI Act 2002 about holding of Auction for the sale of secured assets on above mentioned date.

Enquiry: Rambhau Taktewale, Authorised Officer, Mobile No. 9561064635, Mr. Dattaraj Rane, City Case Officer, Mobile No.9607379383

Date: 13.10.2026
Place: Mumbai

Sd/-
Authorised Officer, State Bank Of India

केनरा बैंक Canara Bank
SyndicateBank

Regional Office Amravati
3rd Floor, Sahyadri Heights, Plot No. 03 and 04, S.No. 25/3, 25/4, Mardi Road, Amravati 444602
Email: ronag2rec@canarabank.com

AUCTION OF VEHICLES/ MACHINERY (MOVABLES)

Notice is hereby given to the public in general and to the Borrower/s and Guarantor/s in particular by the Authorized Officer, that the under mentioned vehicles/machineries are hypothecated to Canara Bank, will be sold through Auction as for the recovery of under mentioned dues with further interest, charges and costs etc.

The Movables are being sold on **"AS IS, WHERE IS, WHATEVER THERE IS AND WITHOUT RECOURSE& NO COMPLAINT BASIS"** as such sale is without any kind of warranties and indemnities. The under mentioned vehicles/machineries will be sold in auctioned through the OFFLINE MODE (AT BRANCH PREMISES) on **28.10.2026.**

Sr. No.	Borrower Name & BRANCH, Loan A/c	Details of Vehicles/Machinery & Year of Mfg)	OUTSTANDING DUES AS ON 12.10.2026	RESERVE PRICE / EMD AMOUNT / Increasing offer of Bidding	Account Details for payment of EMD Amount / Contact No Of Branch & Mail Id
1.	**MR. DIGAMBAR VIDYADHAR RAUT (BRANCH-WARUD 5819)**	1)MAKE-FOUR-WHEELER TOYOTA KIRLOSKAR MOTOR PVT LTD CLASS OF VEHICLE- MOTOR CAR-LMV MODEL: TOYOTA RUMION S CNG (MT) FUEL USED –PETROL YEAR OF MANUFACTURE-2025 SEATING CAPACITY-07 TYPE OF BODY -RIGID (PASSENGER CAR) CLOUR-CAFÉ WHITE CLASS OF VEHICLE- LMV (PASSENGER VEHICLE) PRESENT CONDITION-GOOD	Rs. 31,03,204.18/-	Rs 8,00,000/- Rs 80,000/- Rs 10,000/-	209272434 (IFSC –CNRB0005819) 8956726018 (WARUD) cb5819@canarabank.com

TERMS AND CONDITIONS OF AUCTION

1. Auction/bidding shall only be through "offline mode" at branch premises
2. Date & time of auction – **28.10.2026 between 11.30 AM to 1.30 PM.**
3. Last date of deposit of EMD amount & submission of bids on or before – **27.10.2026 by 05.00 P.M.**
4. Date of Inspection of vehicles/machineries with prior appointment –ON or BEFORE **27.10.2026 BY 5.00 PM**
5. The intending bidders should submit a copy of the bid form along with the following documents/details on or **before 27.10.2026 by 5:00 PM.** - Photocopies of PAN Card, ID Proof and Address proof. However, successful bidder would have to produce these documents in original to the Bank at the time of making payment of balance purchase (Sale Consideration amount) amount.
6. For participating in auction, the intending bidders have to deposit EMD amount by way of RTGS/NEFT/Funds/DD/ Pay order to the credit of account of the branch mentioned in the table above. Bidders Name. Contact No. Address, E Mail Id &Bidder's A/c details for online refund of EMD shall be submitted along with Auction form.
7. Auction would commence at Reserve Price, as mentioned above. The bidder who submits the highest bid (above the Reserve Price) on closer of auction shall be declared as successful bidder.
8. The Successful bidder has to deposit 90% of the sale price (Exclusive of EMD already paid) within 15 days from the date of confirmation of sale. If the successful bidder fails to pay the balance sale price as within 15 days of confirmation of sale, the deposit (Including EMD) made by him shall be forfeited.
9. The EMD deposited by unsuccessful bidder shall be refunded to them & it shall not carry any interest.
10. Registration formalities as well as all expenditure at RTO office to be borne by the purchaser only.
11. The authorized officer of the bank reserves the right to postpone/ cancel auction as well as vary the terms and conditions of the auction without assigning any reason thereof.
12. Intending bidders are kindly requested to inspect the vehicles/machinery to know its exact condition & nature and also make independent inquiries & due diligence to satisfy themselves regarding condition of vehicle/machinery before submission of bid. Bank afterwards will not entertain any objection about condition of vehicles/machinery.
This may also be treated as notice to the borrower/s and guarantor/s of the above-mentioned loan about the holding of Auction Sale on the above-mentioned date, if their outstanding dues are not repaid in full.

Place: AMRAVATI
Date: 12.10.2026

Authorized Officer,
Canara Bank

माजी सैनिकांसाठी नागपुरात १६ ला रोजगार मेळावा

नागपूर : भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलातून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांना नागरी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महासंचालनालय पुनर्वसन विभागातर्फे (डीजीआर) १६ ऑक्टोबरला नागपुरात विशेष रोजगार मेळावा आयोजित केला आहे. रेशीमबाग येथील सुरेश भट सभागृहात सकाळी सात वाजल्यापासून सुरू होणाऱ्या मेळाव्यात सुरक्षा, माहिती तंत्रज्ञान, प्रशासन, लॉजिस्टिक्स, आरोग्यसेवा आणि अभियांत्रिकी अशा विविध क्षेत्रांतील कंपन्या या मेळाव्यात सहभागी होणार आहेत.डीजीआरच्या संकेतस्थळावरील 'जॉब फेअर' या पर्यायातूनही नोंदणी करता येणार आहे. माजी सैनिक आणि नियोक्त्यांसाठी नोंदणी विनामूल्य आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये देशभरात असे १८ रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत.

गटाराच्या पाण्यामुळे विहिरी दूषित

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : यंदा पाऊस कमी झाला. धरणात पाण्याचा साठा कमी आहे. त्यामुळे पुढचा उन्हाळा अधिकच कठीण जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारने पाणी कपातीचे धोरण स्वीकारले आहे. त्याचप्रमाणे पाण्याचे स्रोत बळकट करण्याच्या सूचना आहेत. पाण्याची संभाव्य टंचाई बघता सध्या विहिरीच्या पाण्याचा वापर वाढत आहे. मात्र अनेक विहिरींचे पाणी दूषित आहे. मलवाहिन्या जीर्ण झाल्याने त्याचे पाणी लगतच्या विहिरींमध्ये झिरपत असल्याने त्याचे पाणी दूषित होत आहे.

शहरातील अनेक भागातील मलवाहिन्या जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे त्या तुंबत आहेत. त्यातील दूषित पाणी झिरपून लगतच्या विहिरींमध्ये झिरपत त्यामुळे विहिरांचे पाणी सुद्धा दूषित होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. पाणी दूषित झाल्याने नागरिकांना या विहिरींच्या पाण्याचा वापरच करता येत नाही. च

इंद्रमणीनगर येथील उमेश यांनी सांगितले की, त्यांच्या भागातील मलवाहिन्या फार जुन्या आहेत. ३०-४० वर्ष झाले आहेत. जीर्ण झाल्याने त्या वारंवार तुंबतात. त्यातील पाणी झिरपत विहिरींत येते. त्यामुळे विहिरीचे पाणी घाण होत असते. याच भागातील दुसरे नागरिक म्हणाले, मलवाहिन्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून त्या दुरुस्त करण्यात येतात. परंतु त्यानंतर त्या पुन्हा तुंबतात. त्यामुळे गटार लाइन नवीन टाकण्याची गरज आहे.

जीर्ण मलवाहिन्यांचा फटका



शहरात तीन हजार किमीवर गटार लाइन

नागपूर शहरात तीन हजार किमीवर मलवाहिन्यांचे जाळे पसरले आहे. अमृत योजनेंतर्गत नवीन नवीन पाइप लाइन टाकण्यात येत आहे. परंतु अनेक वसाहतीत जुन्या जीर्ण लाइन आहेत. त्यामुळे या नवीन लाइन टाकण्यासोबत जुन्या गटार लाइन बदलण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

ट्रकचालकाला लुटणारे दोघे जेरबंद

नागपूर : बाह्य वळण मार्गावर चहा पिण्यासाठी थांबलेला ट्रकचालक आणि त्याच्या सहकाऱ्याला चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या दोन सराईतांना पारडी पोलिसांच्या पथकाने सोमवारी भांडेवाडी येथून अटक केली. राहुल मोहन चौधरी (१९) आणि प्रियांशू ऊर्फ पांडा मंगलदास ठाकरे (२२) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

easy
ईझी होम फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 302, तिसरा मजला, सॅवॉय चेंबर्स, दत्तात्रय रोड व वि.पी. रोड (एक्स.), सांताक्रूझ (प), मुंबई - 400054. **CIN:** U74999MH2017PLC297819
वेबसाईट: www.easyhomefinance.in | **ईमेल:** contact@easyhomefinance.in
टोल फ्री: 1800 22 3279` **टेली:** +91 22 3550 3442 | **टेली:** +91 22 3521 0487

परिशिष्ट IV नियम 8(1)
ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी,
निम्नस्वाक्षरीकार हे ईझी होम फायनान्स लिमिटेड (ईएचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **दि. 03 जुलै, 2026** रोजी एक मागणी सूचना पाठवली ज्यात **श्री. अनिल ऋषी तुलकाने आणि श्रीमती प्रमिला अनिल तुलकाने (कर्जदार / सह-कर्जदार / गहाणकार)** यांना सूचनेत नमूद रक्कम **रु. 12,92,938/- (रुपये बारा लक्ष ब्याण्णव हजार नऊशे अडतीस फक्त)** अधिक 13(2) पासून भरणा आणि / किंवा वसूलीच्या दिनांकापर्यंतची पुढील थकबाकी शुल्के यांचा सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.
कर्जदार / सह-कर्जदार / गहाणकार यांनीसदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे कर्जदार / सह-कर्जदार / गहाणकारआणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सदर नियमांमधील नियम 6 व 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतलेला आहे.
कर्जदार / सह-कर्जदार / गहाणकार आणि सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो ईझी होम फायनान्स लिमिटेड च्या **रु. 12,92,938/- (रुपये बारा लक्ष ब्याण्णव हजार नऊशे अडतीस फक्त)** अधिक पुढील व्याज एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल.
सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) च्या तरतुदींकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

मालमत्तेचे वर्णन
मालमत्तेचा पत्ता: **प्लॉट क्र. 32 (उत्तर भाग), ख.क्र. 71/3, प.ह.क्र. 7, शीट क्र. 553/69 आणि 961/87, सीटीएस क्र. 280 आणि 283, वॉर्ड क्र. 67, हिमालया सनशाईन जवळ, मौजा दाभा, तह. आणि जिल्हा नागपूर - 440013.**
विक्री खतानुसार: पूर्वेस- प्लॉट क्र. 33, **पश्चिमेस** - प्लॉट क्र. 32 चा उर्वरित भाग, **उत्तरेस**- रस्ता, **दक्षिणेस**- इतर खसरा. **साईट नुसार: पूर्वेस**- प्लॉट क्र. 33, **पश्चिमेस** - प्लॉट क्र. 32 चा उर्वरित भाग, **उत्तरेस**- रस्ता, **दक्षिणेस**- इतर खसरा.
स्थान: महाराष्ट्र **स्वा/-प्राधिकृत अधिकारी**
दिनांक: 10 ऑक्टोबर, 2026 **ईझी होम फायनान्स लिमिटेड**

जिल्हा परिषद - व्हीएनआयटीत निविदा प्रक्रियेसाठी सामंजस्य करार

पारदर्शक, गुणवत्तापूर्ण विकासकामांसाठी जिल्हा परिषदेचा पुढाकार



लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : जिल्हा परिषद आणि विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीएनआयटी) यांच्यात शनिवारी विविध विकासकामांच्या निविदा प्रक्रियेत तांत्रिक सहकार्यासाठी सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला. अशा प्रकारचा करार करणारी नागपूर ही राज्यातील पहिलीच जिल्हा परिषद ठरली आहे.

या करारांतर्गत डीपीसी, खनिज निधी व जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून राबवण्यात येणाऱ्या ५० लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या विकासकामांच्या निविदांसाठी व्हीएनआयटीच्या तज्ज्ञांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. यामध्ये स्थापत्य कामे, विविध उपकरणे, साहित्य खरेदी आणि पाणीपुरवठा व जलसंधारण विभागाच्या निविदांचाही समावेश असेल. निविदापूर्व टप्प्यात तांत्रिक तपशील निश्चित करणे व बांधकामांच्या संरचनात्मक बाबींमध्ये मार्गदर्शन, निविदा प्रक्रियेदरम्यान तज्ज्ञांचा सहभाग, तसेच निविदेनंतर साहित्याचे नमुना परीक्षण, दर्जा तपासणी, साहित्याच्या स्थापनेनंतर पडताळणी आणि किमतींचे मूल्यमापन यासाठी व्हीएनआयटीचे सहकार्य घेण्यात येईल.

विकासकामांसाठी रास्त व वाजवी दर सुनिश्चित करणे, गुणवत्तेची हमी बळकट करणे आणि निविदा प्रक्रिया विहित कालमर्यादेत पारदर्शक पद्धतीने पूर्ण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यामुळे शासनाच्या निधीचा प्रभावी व योग्य विनियोग होऊन प्रत्येक खर्चातून जास्तीत जास्त सार्वजनिक मूल्य साध्य करण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी व्यक्त केला.

उत्सवांसाठी प्रीपेड स्मार्ट मीटर सक्तीचे

नागपूर : नवरात्रोत्सव, दुर्गापूजा, गरबा महोत्सव आणि दीक्षाभूमीवरील ५६ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी तात्पुरती वीजजोडणी घेणाऱ्या मंडळांना यंदा प्रीपेड स्मार्ट मीटर बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. मोबाईलप्रमाणे आधी पैसे भरून वीज वापरता येणार असून, महावितरणच्या संकेतस्थळावर किंवा मोबाईल अनुप्रयोगाद्वारे अर्ज करावा लागेल. आवश्यक माहिती व कागदपत्रांसह पूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांत वीजजोडणी मंजूर केली जाणार आहे.

स्मार्ट प्रीपेड मीटरबाबत आजही विविध संघटनेकडून विरोध केला जात आहे. त्यानंतरही महावितरणने हे मीटर प्रीपेड केले जाणार नसल्याचे सांगत ग्राहकांकडे लावणे सुरू केले आहे. त्यासाठी सक्ती केली जात असल्याने ग्राहकांचा आरोप आहे. त्यातच गेल्या वर्षी नागपूर परिमंडलात ८० हून अधिक नवरात्रोत्सव आणि दुर्गापूजा मंडपांना तात्पुरती वीजजोडणी देण्यात आली होती. यंदाही मोठ्या संख्येने अर्ज येण्याची शक्यता आहे.

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी विद्यापीठाची कृती समिती

परीक्षा शुल्क न घेता अर्ज पाठवण्याचे महाविद्यालयांना निर्देश

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक अडचणींचा सामना करावा लागू नये, तसेच त्यांना आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने कृती समिती गठित केली आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निवारण करणे आणि त्यांना शैक्षणिक सवलती मिळवून देण्यासाठी विद्यापीठ स्तरावर ही समिती कार्य करणार आहे.

कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे आणि कुलसचिव डॉ. विजय खंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गठित समितीच्या अध्यक्षपदी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अनुप पळसोकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. विजय तांगडे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सोपानदेव पिसे हे समितीचे सदस्य आहेत. परीक्षा व मूल्यमापन विभागाचे उपकुलसचिव मोतीराम तडस हे समन्वयक तथा संपर्क अधिकारी म्हणून काम पाहतील.

राज्यात यंदा ३४ जिल्ह्यांतील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती घोषित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रत्येक विद्यापीठ स्तरावर कृती समिती स्थापन करून दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मदत करण्याचे आणि त्यांच्या अडचणी दूर करण्याचे निर्देश दिले होते. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या सूचनेनुसार नागपूर विद्यापीठाने ही समिती गठित केली आहे. विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांनी समन्वयाने पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून द्यावी, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

परीक्षा शुल्कातून सवलत

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने ३० सप्टेंबरला निर्गमित केलेल्या पत्रानुसार, दुष्काळग्रस्त तालुक्यांतील सवलतीस पात्र विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा शुल्क घेऊ नये. संबंधित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकित करून विद्यापीठाकडे पाठवणे आवश्यक आहे. या प्रक्रियेत दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना नियमानुसार सवलती मिळाव्यात आणि त्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी महाविद्यालयांनी सहकार्य करावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विजय खंडाळ यांनी केले आहे.

एमके टूल्स लिमिटेड
EMKAY TOOLS LTD
नोंदणीकृत कार्यालय आणि फॅक्टरीचा पत्ता: बी-27 आणि बी-27/1, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल एरिया, हिंगणा रोड, नागपूर- 440016 (भारत)
सीआयएन: एल25939एमएच2023पीएलसी401627
दूरध्वनी क्र. 91-9226071464
ई-मेल: investors@emkaytoolsltd.com, **वेबसाईट:** www.emkaytoolsltd.com

वित्तीय वर्ष 2026-27 साठीच्या पहिल्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, एमके टूल्स लिमिटेडच्या सदस्यांची पहिली विशेष सर्वसाधारण सभा गुरुवार, दि. 5 नोव्हेंबर 2026 रोजी सकाळी 11.00 वाजता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात आयोजित करण्यात येणार आहे. त्या सभेत होणाऱ्या विशेष कामकाजाचा तपशील देणारी सूचना सदस्यांना पाठवण्यात आली आहे.
कंपनी कायदा, 2013 च्या लागू तरतुदी, त्याअंतर्गत बनवलेले नियम आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, 2015 यांच्या अनुपालनात, विशेष सर्वसाधारण सभेची सूचना, स्पष्टीकरणात्मक विवरण, उपस्थिती स्लिप आणि प्रॉक्सी फॉर्म **(फॉर्म एमजीटी-11)** हे कंपनी / डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे ईमेल पत्ते नोंदणीकृत असलेल्या सर्व सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आणि इतर सर्व सदस्यांना परवानगी असलेल्या प्रत्यक्ष पद्धतीने पाठवण्यात आले आहे.
पहिल्या ईजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट www.emkaytoolsltd.com यावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. लागू असलेल्या आवश्यकतांनुसार, ईजीएमची सूचना नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाईट www.nseindia.com यावर देखील उपलब्ध आहे.
ठरावांवरील मतदान कार्यक्रमस्थळी प्रत्यक्षपणे मतपत्रिकेद्वारे घेण्यात येईल. उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेला सदस्य, स्वतःऐवजी उपस्थित राहण्यासाठी आणि मतदान करण्यासाठी प्रतिनिधीची नेमणूक करण्यास पात्र आहे. रीतसर भरलेले प्रॉक्सी फॉर्म सभेच्या किमान **48 तास** आधी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात पोहोचले पाहिजेत.
दि. 12 ऑक्टोबर, 2026 रोजी, असाधारण सर्वसाधारण सभेत उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेल्या भागधारकांना ओळखण्याची अंतिम तारीख असल्याने, भागधारक स्वतः किंवा संचालक मंडळाने सुचविल्याप्रमाणे प्रॉक्सीद्वारे मतदानाने सभेत उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असतील. सभेत उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेल्या व्यक्ती स्वतः किंवा प्रॉक्सी/अधिकृत प्रतिनिधीमार्फत मतदान करू शकतात, मात्र अट अशी आहे की, सभेत उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने रीतसर स्वाक्षरी केलेले सर्व प्रॉक्सी/अधिकृतता, सभेच्या किमान 48 तास आधी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.
नागपूर येथील प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज मेसर्स पी. सुरभी ॲण्ड असोसिएट्स यांची ईजीएमनंतरच्या मतदानाचे आयोजन आणि छाननी करण्यासाठी छाननीकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
एमके टूल्स लिमिटेड यांच्यासाठी
सही/-
ठिकाण: नागपूर रिया सारंग अग्रवाल
दिनांक: 13 ऑक्टोबर, 2026 **कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील महिलांचा सन्मान

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : शेतकरी आत्महत्येनंतर कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पेलणाऱ्या महिलांच्या संघर्षाची दखल घेत कर्मयोगी फाऊंडेशनतर्फे १७ ऑक्टोबरला १५१ महिलांचा साडीचोळी देऊन सन्मान करण्यात येणार आहे. बुटीबोरी येथील आई सभागृहात सकाळी ११ वाजता हा सोहळा होणार आहे. घरातील कर्त्या पुरुषाच्या निधनानंतर आर्थिक संकटाचा सामना करत शेती सांभाळणाऱ्या, मुलांचे शिक्षण पूर्ण करून कुटुंबाला सावरणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव या उपक्रमातून केला जाणार आहे. प्रत्येकी एक हजार रुपये किमतीची साडीचोळी देऊन महिलांचा सन्मान करण्यात येईल. तसेच संबंधित कुटुंबांतील आई, मुलगी आणि बहिणींच्या योगदानाचीही दखल घेतली जाणार आहे.

कर्मयोगी फाउंडेशनतर्फे २०१९ पासून नवरात्रोत्सवात उपक्रम राबवला जातो. यंदा विदर्भातील शेतकरी आत्महत्यांची पार्श्वभूमी लक्षात घेऊन हा सोहळा होणार आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील इच्छुक महिलांनी १० ऑक्टोबरपर्यंत पंकज ठाकरे (९३७२३४१३४७) किंवा शिवाजी बारेवार (९०११७७९००९) यांच्याशी संपर्क साधावा.असे आवाहन फाऊंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५८ व्या पुण्यतिथीनिमित्त रविवारी नागपूर विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्याला कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या हस्ते माल्यार्पण केले.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विजय खंडाळ, अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. संजय ढोबळे, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनाच्या प्रमुख डॉ.



विजयालक्ष्मी थोटे आदींची उपस्थित होती.

तसेच विद्या विभागाचे प्रभारी उपकुलसचिव गणेश कुमकुमवार, उद्यान अधीक्षक प्रवीण गोतमारे, शैलेश राठोड, नितीन खरबडे यांच्यासह अध्यासन विभागातील डॉ. देवमन कामडी, प्रा. वर्षा पाटील, प्रा. दिव्या राजुरकर, प्रा. आतिश राठोड, प्रा. राहुल उईके, कल्याणी मेश्राम, छाया खोब्रागडे, रमेश मेहर आणि विद्यापीठातील अन्य कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. सुनीता सावरकर यांना मातोश्री भीमाबाई आंबेडकर पुरस्कार

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : सातारा येथील संबोधी प्रतिष्ठानच्यावतीने दिला जाणारा २८व्या मातोश्री भीमाबाई आंबेडकर पुरस्कारासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाच्या प्रमुख डॉ. सुनीता सावरकर यांची निवड करण्यात आली.

आंबेडकरी विचार, दलित इतिहास, स्त्रीवादी इतिहासलेखन आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतील त्यांच्या संशोधनात्मक योगदानाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री भीमाबाई आंबेडकर यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो.



साहित्य, कला, संस्कृती आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत मोलाचे योगदान देणाऱ्या महिलांचा गौरव करण्याच्या उद्देशाने संबोधी प्रतिष्ठानने १९९८ पासून या पुरस्काराची सुरुवात केली. दहा हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल आणि पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनी आयोजित विशेष समारंभात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांच्या हस्ते डॉ. सावरकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. सावरकर या भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयांतर्गत कार्यरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनशी संबंधित असून, नागपूर विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक म्हणूनही कार्यरत आहेत.


महावितरण
जाहीर निवेदन
विषय :- कंत्राटदार अनामत रक्कम निर्लेखित करण्याबाबत.
मंडळ कार्यालय, गडचिरोली अंतर्गत सर्व ठेकेदार व खाली दिलेल्या विविध कारणास्तव जे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे लेनदार आहेत अशा सर्वांना कळविण्यात येते की, या कार्यालयाकडे जमा रक्कम जसे (१) कंत्राटदार अनामत रक्कम (Security Deposit), (२) बयाना रक्कम (EMD), (३) कंत्राटदार धारणा रक्कम (Contractor Retention Money) आर्थिक वर्ष २०२४-२०२५ पर्यंतची निर्लेखित करावयाचे आहे. तरी मंडळ कार्यालय अंतर्गत काम केलेले ठेकेदार व विविध कारणास्तव असलेले लेनदार यांनी त्याची दखल घ्यावी व आपल्याकडील मुळ जमा पावती तसेच उपलब्ध दस्तऐवजासह रक्कम परताव्यासाठी अर्ज करावयाचा आहे. तरी याबाबत हरकत असल्यास दि.२६.१०.२०२६ पर्यंत अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, गडचिरोली व कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, आलापल्ली, ब्रम्हपुरी, गडचिरोली येथे संपर्क साधावा. दि.२६.१०.२०२६ नंतर सदरची रक्कम निर्लेखित केली जाईल. तसेच त्यानंतरची कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही. तसेच मंडळ व विभागीय कार्यालय यास जबाबदार राहणार नाही.
संपर्कासाठी :-
मंडळ कार्यालय :- श्री. मनोज लथाड, उप-व्यवस्थापक (विवले) मो. क्र. ७८७५७६११७२
आलापल्ली विभाग :- श्री. विवेक पाटील, उपव्यवस्थापक (विवले) मो. क्र. ७८७५७६१८५५
ब्रम्हपुरी विभाग :- श्री. संदीप पारधी, उपव्यवस्थापक (विवले) मो. क्र. ७८७५७६१९२२
गडचिरोली विभाग :- श्री. रोशन देव्हारे, उपव्यवस्थापक (विवले) मो. क्र. ७८७५७६१८२५.
P.R. No.101 Dt. 09.10.2026
अधिक्षक अभियंता, सं.व.सु. मंडळ, म.रा.वि.वि.कं.मर्या., गडचिरोली.

'लाभले आम्हास भाग्य...' गीतातून माय मराठीचा जागर

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...' या गीताच्या स्वरांनी सभागृहातील वातावरण मराठीमय झाले. लोककला, भावगीते, पोवाडा आणि पारंपरिक नृत्यांच्या सादरीकरणातून मराठी भाषेचा आणि संस्कृतीचा गौरव करणारा 'अभिमान मराठी, अभिजात मराठी' हा सांस्कृतिक कार्यक्रम शनिवारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पार पडला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठात मराठी भाषा, संस्कृतीच्या गौरवासाठी 'अभिमान मराठी, अभिजात मराठी' हा कार्यक्रम सादर करण्यात आला.



अभिजात मराठी भाषा सप्ताह २०२६ निमित्त जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात कार्यक्रम पार पडला. मुंबई येथील हेरंब निर्मित एस. एन. एंटरटेनमेंटच्या कलावंतांनी माय मराठीचा जागर केला. कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे, कुलसचिव डॉ. विजय खंडाळ, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रवींद्र शोभणे, मराठी भाषा विभागाचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने भाषेच्या विकासासाठी नवी संधी निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन कुलगुरूंनी केले. विद्यापीठातील कामकाज मराठीतून करण्यावर भर दिला जात असून, मराठीचा प्रसार आणि संवर्धन करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी भाषा विभागाचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांनीही ज्ञानदानाच्या माध्यमातून गावपातळीपर्यंत मराठीचा प्रसार करण्याबरोबरच भाषेच्या जतनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज व्यक्त केली.

सपना हेमन यांनी 'माय भवानी तुझे लेकरू...', तर अभिजीत कोसंबी यांनी 'कानडा राजा पंढरीचा' आणि 'भेटला विठ्ठल माझा' ही गीते सादर केली. प्रसेनजित कोसंबी यांनी 'माझी मैना गावाकडे राहिली' ही अण्णाभाऊ साठे यांची छक्कड आणि 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे गीत सादर केले. पारंपरिक नृत्ये, संस्काराची लावणी आणि पोवाड्याने कार्यक्रमाची रंगत वाढवली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या मंत्रिमंडळाचा देखावाही सादर करण्यात आला. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी केले.

निवास हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची निवास हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड)
नोंद. कार्यालय: ए1, सहावा मजला, ट्रेड स्टार, अंधेरी कुर्ला रोड, जे बी नगर, अंधेरी (पु), मुंबई - 400059
NIWAS HOUSING FINANCE

ताबा सूचना
[नियम 8(1) आणि (2)]
ज्याअर्थी, येथे नमूद सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील (नियम 3) सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत मागणी सूचना जारी केली ज्यात कर्जदारांना सदर सूचनेत नमूद रकमेचा सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.
कर्जदाराने सदर रकमेचा भरणा न केल्याने याद्वारे कर्जदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की एनएचएफएल चे प्राधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मध्हील नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत प्रत्येक मालमत्तेसामोर दिलेल्या दिनांकास खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.
सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) कडे वेधण्यात येते.
याद्वारे कर्जदार आणि सर्व लोकांना सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो एनएचएफएल यांच्या खाली नमूद रक्कम व तीवरील व्याजाच्या भाराधीन असेल.

कर्ज खाते क्रमांक	कर्जदार व मालमत्तेचा तपशील	मागणी सूचनेतील रक्कम व दिनांक	ताबा दिनांक	ताब्याची स्थिती
LNNAGLAP-02250053839	1. योगेश भांडूजी मारबते (कर्जदार) 2. श्रीमती इंदुताई भांडूजी मारबते (सह-कर्जदार)	रु. 4,16,000/- (रुपये चार लक्ष सोळा हजार फक्त) दिनांक: 22-जुलै-2026	09-ऑक्टो-2026	सांकेतिक ताबा

मालमत्तेचे वर्णन: गावठाण मालमत्ता क्र. 125, क्षेत्रफळ सुमारे 1410 चौ.फू. (131.99 चौ.मी.), सोबत तेथील संरचना, मौजा इ भांडगी, भांडगी ग्रामपंचायतच्या हद्दीत, तालुका कळमेश्वर व जि. नागपूर आणि चतुःसीमा: पूर्वेस - बाबाराव दुरुगवार यांचे घर, पश्चिमेस - हेमंत कडू यांचे घर, उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - श्याम गावलावे यांचे घर.
स्थान: नागपूर **स्वा/- प्राधिकृत अधिकारी**
दिनांक: 13.10.2026 **निवास हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**